

# येशू विषयीची शुभवार्ता नव्या करारामधून

## प्रस्तावना

## येशूविषयीच्या शुभवार्तेची ही पुस्तिका - असू शकेल.

१. येशूचा परस्पर परिचय

२. येशूच्या शुभवार्तेद्वारे परीक्षण करावे

३. आणि येशूविषयीची शुभवार्ता संपूर्ण जगास सांगावयास हे माध्यम उपयोगी पडणारे आहे.

त्याकरितां पुढील अभ्यास आणि वाढीकरीतां तुम्ही नव्या कराराचे वाचन कराल आणि तद्वत संपूर्ण पवित्र शास्त्राचा उद्देश लक्षात घ्याल, पूर्णतः येशूची माहिती मिळवाल. आणि शक्य आहे की सर्व देवाचा मौल्यवान आशिर्वाद प्राप्त करून घ्याल.

लेनार्ड गलस्टर

# THE GOOD NEWS ABOUT JESUS

From the New Testament

Copyright©1992 by Lenard Glaster


To my wife Ruth, and son David

1st printing, 1979
2nd printing, 1983
3rd printing, 1992
4th printing, 1994
5th printing, 2000
6th printing, 2002
7th printing, 2007
500,000 copies in print in English, French, Chinese, Spanish, Hindi, Arabic, Russian, German, Vietnamese, Korean, Thai, Karen, Samoan, Swahili, Latvian, Lithuanian, Luhyan, Ukrainian, Krahn, Somali, Amharic, Oromo, Urdu, Telugu, Tamil, Malayalan, as well as Braille, and large print. Kannada and Marathi Other languages are in preparation.
5000 Copies of this Marathi Edition is printed by the Shree Sumukh Mudran, Mumbai 2007
Translator : **Rev. Sadanand A. Dandge**
Cover Design : **Lenard Galster**
Artwork : **Mark Watkins**

*Scripture references from the* ***GOOD NEWS BIBLE.***
*Copyright : American Bible Society. Used by permission*


# येशू विषयीची शुभवार्ता

## नव्या करारामधुन



JESUS

EVANGELISM



# येशू विषयीची शुभवार्ता
# नव्या करारामधुन

## अनुक्रमणिका


१. देव येशूमध्ये या जगात आलेला आहे............ ६

२. येशू या व्यक्तीसंबंधी काहीएक......... ८

३. येशू लोकांस त्याचे शिष्य म्हणून बोलावीतो........ १२

४. येशू शिकवितो व लोकांना आशिर्वाद देतो.......... १४

५. येशू त्याच्या अनुयायांच्या गरजा पुरवितो............ १६

६. येशू प्रार्थनेची उत्तरें देंतो...................... १८

७. येशू पापांची क्षमा करितो आणि लोकांस बरे करितो... २०

८. येशू लोकांस देवाकडे चालवितो आणि तेही जीवनभर.. २२

९. येशू जगाला तारण पुरवितो ............... २९

१०. येशू त्याच्या लोकांस नवीन जीवनात आणितो... ३२

११. येशू त्याची मंडळी उभारतो........... ३६

१२. येशू त्याच्या लोकांस स्वर्गात घेणार आहे...... ४०

## भाग पहिला

## देव हा येशूमध्ये या जगात आलेला आहे.

### १. देव हा येशू द्वारें लोकांकडे आलेला आहे.

"देवाचा पुत्र येशू ख्रिस्त ह्याच्याविषयी हे शुभवर्तमान आहे." मार्क १:१

"'कारण ती देवाची स्वत:ची अशी इच्छा होती की त्याच्या पुत्राच्या ठायी त्याची पूर्णता वसावी." कलस्सैकरास पत्र १.१९

"जेव्हा काळांची पूर्णता झाली तेव्हां देवानें आपल्या पुत्राला पाठवलें; तो स्त्रीपासून जन्मलेला असा होता." गलतीकरांस पत्र ४:४



**२ ) ''येशू'' या नावाचा अर्थ पापांपासून तारणारा.**

'' त्याचें नांव येशू असे ठेव - कारण तोच आपल्या प्रजेला त्यांच्या पापांपासून तारील.'' मत्तय १:२१

**३ ) येशू हा तारणारा म्हणून येणार आणि मोठा आनंद होणार!**

''तेंव्हां देवदूत त्यांना म्हणाला, भिऊं नका, कारण पाहा, जो मोठा आनंद सर्व लोकांस होणार आहे, त्याची सुवार्ता मी तुम्हांस सांगतों; ती ही की, तुमच्यासाठी आज दावीदाच्या गावांत तारणारा जन्मला आहें. तो ख्रिस्त प्रभु आहे!'' लुक २:१०.११

**४ ) येशू ख्रिस्त जिथे जन्मला, जगला व कार्यरत राहिला ती ठिकाणे आजही अस्तित्वात आहेत.**

''हेरोद राजाच्या काळांत यहुदीयातील बेथलहेमांत येशूचा जन्म झाला.'' मत्तय २:१

''नंतर योहानाला अटक झाली आहे हें ऐकून येशू गालीलांत निघून गेला आणि नासरेथ सोडून जबुलून नफताली ह्यांच्या हद्दींत असलेल्या समुद्रकिनाऱ्यावरील कफर्णहुमास जाऊन राहिला.'' मत्तय ४:१२-१३

''येशूनें आपल्या कार्याचा आरंभ केला, तेंव्हा तो सुमारें तीस वर्षांचा होता.'' लुक ३:२३

## भाग दुसरा
## येशू या व्यक्तीसंबंधी काहीएक

### ५ ) येशू हा बुद्धीमान व प्रभावी व्यक्तीमत्वाचा होता.

" त्याचें बोलणें जे ऐकत होते, ते सर्व त्याच्या बुद्धीवरून व उत्तरावरून थक्क झाले." लुक २.४७

"त्याच्या शिकवणीवरून लोक थक्क झाले, कारण तो त्यांना शास्त्री लोकांसारखा नव्हे तर अधिकार असल्यासारखा शिकवीत होता." मार्क १:२२

"तेव्हां सर्व त्याची वाहवा करूं लागले आणि जीं कृपावचनें त्याच्या मुखातून निघत होती त्यांविषयीं आश्चर्य करू लागलें." लुक ४:२२



६. येशू हा लौकिक आहे.

" मग गालील, दकापलीस, यरूशलेम, यहुदीया व यार्देनच्या पलीकडचा प्रदेश ह्यांतून लोकांचे थव्यांचे थवे त्याच्यामागें चालले." मत्तय ४:२५

" तो यरूसलेमेंत आल्यावर सर्व नगर गजबजलें व म्हणालें, हा कोण?" मत्तय २१.१०

७ ) येशू हा सौम्य व लीन आहे.

"मी जो मनाचा सौम्य व लीन आहें त्या माझें जूं आपणावर घ्या व माझ्यापासून शिका म्हणजे तुमच्या जिवांस विसांवा मिळेल." मत्तय ११:२९

८ ) येशू हा प्रेमस्वरूप आहे.

"जशी पित्यानें माझ्यावर प्रीति केली आहे तशी मींही तुम्हांवर प्रीति केली आहे.तुम्हीं माझ्या प्रीतित रहा." योहान १५:९

९ ) येशू हा आनंददायी आहे.

"त्याच घटकेस तो पवित्र आत्म्यांत उल्लासित झाला." लुक १०:२१

"माझा आनंद तुम्हांमध्यें असावा व तुमचा आनंद परिपूर्ण व्हावा म्हणून मीं तुम्हाला ह्या गोष्टी सांगितल्या आहेत." योहान १५:११

१० ) येशू हा मित्रत्वाचा आहे.

"मी आतांपासून तुम्हांला दास म्हणत नाही; कारण धनी काय करितो तें दासाला ठाऊक नसतें; परंतु मी तुम्हांला मित्र म्हटलें आहे; कारण जें काही मीं आपल्या पित्यापासून ऐकून घेतलें तें सर्व मीं तुम्हांला कळविलें आहे." योहान १५:१५

**११. येशूला लोकांच्या दुःखासंबंधी कळवळा येतो.**

"मग तो शहराजवळ आल्यावर, त्याच्याकडे पाहून त्याकरितां रडू लागला." लुक १९:४१

"तेव्हा त्यानें त्यांस म्हटलें, 'माझा जीव' मरणप्राय, अति खिन्न झाला आहे." मत्तय २६:३८

"येशू रडला" योहान ११.३५

**१२. येशू हा दुःखी व कष्टी होतो.**

नंतर येशू शिष्यांबरोबर गेथशेमाने नावाच्या ठिकाणी आला आणि त्यांस म्हणाला, मी पुढे जाऊन प्रार्थना करीपर्यंत येथे बसा, मग त्याने पेत्र व जब्दीचे दोघे मुलगे ह्यांस बरोबर घेतले आणि तो खिन्न व अती कष्टी होऊ लागला.

**१३. येशू हा क्रोधित होतो.**

"मग त्यानें त्यांच्या मनाच्या कठीण पणामुळे खिन्न होऊन त्या सर्वांकडे रागानें पाहिलें,परंतु त्याचवेळी त्याला त्यांचा कळवळा आला, कारण ते तर फार दुराग्रही आणि बहकलेलें असे होते." मार्क ३:५

**१४. येशू हा ममताळु आहे.**

"त्याला मेंढरासारखें वधासाठी नेलें; आणि जसें कोंकरूं कातरणाऱ्याच्या पुढें गप्प असतें, तसा तो आपलें तोंड उघडीत नाही." प्रेषितांची कृत्यें ८:३२

**१५. येशू हा पापविरहित आहे.**

"त्यानें पाप केले नाही, आणि त्याच्या मुखांत कपट आढळलें नाहीं." १पेत्र २:२२

**१६. येशू हा पाप क्षमा करणारा आहे.**

"तेंव्हा येशू म्हणाला, हे बापा, त्यांना क्षमा कर! कारण ते काय करीतात हें त्यांना समजत नाहीं." लूक २३:३४

**१७. येशू हा सामर्थ्यवान असा आहे.**

"तेव्हां येशू जवळ येऊन त्यांच्याशी बोलतांना म्हणाला, स्वर्गात आणि पृथ्वीवरील सर्व अधिकार मला दिलेला आहे." मत्तय २८:१८

"हा त्याच्या गौरवाचें तेज, व त्याच्या तत्वाचें प्रतिरूप असून आपल्या सामर्थ्याच्या शब्दानें विश्वाधार आहे." इब्रीलोकांस पत्र १:३

**१८. येशू हा गौरवशाली आहे.**

"तेव्हा त्याचें रूप त्यांच्यादेखत पालटलें; त्याचें मुख सूर्यासारखें तेजस्वी झालें आणि त्याचीं वस्त्रें प्रकाशांसारखीं शुभ्र झाली. " (मत्तय १७.२)

"त्याचे मुख, तो दिसण्यात यास्फे व सार्दि या रत्नांसारखा होता. राजासनाभोवती दिसण्यात पाचूसारखे मेघधनुष्य होते. " प्रकटीकरण ४:३

# भाग तिसरा

## येशू लोकांस बोलावितो, त्याचे शिष्य होण्यासाठी

**१९. येशू लोकांस म्हणाला माझ्या मागे या आणि सदैव माझ्या बरोबर असा.**

"तुम्ही सर्व माझ्याकडे या." मत्तय ११:२८

"दुसऱ्या दिवशी त्यानें गालीलांत जाण्याचा बेत केला, तेव्हां फिलिप्प त्याला भेटला; येशूनें त्याला म्हटलें, माझ्यामागून ये! योहान १:४३

" मग तेथून जाताना येशूनें मत्तय नांवाच्या मनुष्याला जकातीच्यानाक्यावर बसलेलें पाहून त्याला म्हटले "माझ्या मागे ये! तेव्हां मत्तय उठून त्याच्या मागें गेला." मत्तय: ९:९



"मग दिवस उगवल्यावर त्यानें आपल्या शिष्यांस बोलाविलें; आणि त्यांतून पुढील बारा जणांस निवडून त्यांस प्रेषितः असे नांवही दिलें. शिमोन (त्याला पेत्र असेहि नांव दिलें.) व त्यांचा भाऊ अंद्रिया, याकोब, योहान, फिलिप, बर्थलमय, मत्तय, थोमा, अल्फीचा मुलगा याकोब, जिलोत म्हटलेला शिमोन, याकोबाचा मुलगा यहुदा, आणि पुढें जो द्रोही निघाला तो यहुदा इस्कर्योत." लुक ६:१३-१६

"पुढें येशू त्यांना म्हणाला, मीच जगाचा प्रकाश आहें जो मला अनुसरतो तो अंधारांत चालणारच नाही, तर त्याच्याजवळ जीवनाचा प्रकाश राहील." योहान ८:१२

"मग येशू आपल्या शिष्यांना म्हणाला, माझ्यामागें येण्याची कोणाची इच्छा असेल तर त्यानें स्वतःचा त्याग करावा व आपला वधस्तंभ उचलून घेऊन मला अनुसरावें, कारण जो कोणी आपला जीव वाचवूं पहातो, तो आपल्या जिवाला मुकेल आणि जो कोणी माझ्याकरितां आपल्या जीवाला मुकेल त्याला तो मिळेल." मत्तय १६:२४-२५

"येशू त्यांना म्हणाला, माझ्यामागें या म्हणजे तुम्ही माणसें धरणारे व्हाल, असें मी करीन." मार्क १:१७

"तेव्हां तुम्ही जाऊन सर्व राष्ट्रांतील लोकांस शिष्य करा."मत्तय २८:१९

"परंतु पवित्र आत्मा तुम्हांवर येईल तेव्हां तुम्हांला सामर्थ्य प्राप्त होईल, आणि येरूशलेमेंत सर्व यहुदीयांत शेमरोनांत व पृथ्वीच्या शेवटापर्यंत तुम्ही माझे साक्षी व्हाल." प्रेषितांचीं कृत्यें १:८

# भाग चौथा

## येशू त्याच्या शिष्यांना शिकवण देऊन आशीर्वादित करतो.

### २०. येशू त्याच्या शिष्यांना शिक्षण देतो.

"तेव्हां त्या लोकसमुदायाला पाहून तों डोंगरावर चढला, व तो खाली बसल्यावर त्याचें शिष्य त्याच्याजवळ आले मग तो तोंड उघडून त्यांना शिकवूं लागला." मत्तय ५: १-२

"तो रात्रीचा त्याच्याकडे येऊन त्याला म्हणाला, गुरुजी, आपण देवापासून आलेले शिक्षक आहां, हें आम्हांला ठाऊक आहे; कारण ही जीं चिन्हें आपण करीतां तीं देव बरोबर असल्यावांचून कोणालाहि करतां येत नाहीत." योहान ३.२



## २१. येशू त्याच्या अनुयायांना आशिर्वादित करतो.

"तेव्हां त्यानें बाळकांस कडेवर घेतले, आणि त्यांच्या डोक्यावर हात ठेऊन त्यांना आशीर्वाद दिला." मार्क १०.१६

"नंतर त्यानें त्यांनां बेथानीपर्यंत बाहेर नेलें आणि हात वर करून त्यांना आशीर्वाद दिला." लुक २४.५०

"अहो कष्टी व भाराक्रांत जनहो तुम्ही सर्व माझ्याकडे या म्हणजे मी तुम्हांला विसांवा देईन, मी जो मनाचा सौम्य व लीन आहें त्या माझें जूं आपणांवर घ्या व माझ्यापासून शिका म्हणजे 'तुमच्या जिवांस विसांवा मिळेल' कारण माझें जूं सोयीचे व माझें ओझें हलकें आहे." मत्तय ११.२८.३०

"मी तर त्यांना जीवनप्राप्ती व्हावी व ती विपुलपणे व्हावी म्हणून आलो आहे." योहान १०.१०



# भाग पाचवा

## येशू त्याच्या अनुयायांच्या गरजा पुरवितो.

**२२. येशू त्याच्या अनुयायांच्या शरीरिक, आत्मिक आणि भौतिक गरजा पुरवितो.**

"मग येशूनें त्या पांच भाकरी व दोन मासे घेऊन वर स्वर्गाकडे पाहून आशीर्वाद दिला. आणि भाकरी मोडल्या व त्या त्यांना वाढावयास आपल्या शिष्यांजवळ दिल्या. ते दोन मासेही सर्वांस वांटून दिले." मार्क ६:४१



"नंतर येशू यहुदी लोकांच्या सभास्थानात सुवार्तेची घोषणा करीत व राज्याची सुवार्ता गाजवीत आणि लोकांचे सर्व प्रकारचे रोग व सर्व प्रकारचीं दुखणीं बरीं करीत गालीलभर फिरला." मत्तय ४:२३

"येशू त्यांना म्हणाला, मीच जीवनाची भाकर आहे; जो कोणी माझ्याकडे येतो त्याला कधीही भूक लागणार नाहीं आणि जो कोणी माझ्यावर विश्वास ठेवतो त्याला कधीही तहान लागणार नाही." योहान ६:३५

"'हा त्याच्या गौरवाचे तेज, व त्याच्या तत्त्वाचें प्रतिरूप असूनआपल्या सामर्थ्याच्या शब्दाने विश्वाधार आहे." इब्रीलोकांस पत्र १.३


"आणि माझा देव आपल्या संपत्यनुरुप तमची सर्व गरज ख्रिस्त येशूच्या ठायी गौरवाच्या द्वारे पुरविल." फिलिप्पैकरांस पत्र ४.१९

## भाग सहावा

### येशू प्रार्थनेची उत्तरे देतो.

२३. जो कोणी त्याच्याकडे येतो येशू त्या लोकांचे ऐकतो आणि तो त्यांस मदत करीतो.

"पाहा, आणि एक कुष्टरोगी त्याच्याकडे आला व त्याच्या पायां पडून त्याला म्हणाला, प्रभूजी आपली इच्छा असली तर मला शुद्ध करावयास आपण समर्थ आहां तेव्हा त्याने हात पुढें करून त्याला स्पर्श केला व म्हटलें, माझी इच्छा आहे, शुद्ध हो; लागलेच त्याचे कुष्ट जाऊन तो बरा झाला." मत्तय ८:२:३



''मग येशू कफर्णहुमास आल्यावर एक रोमन शताधिपति त्याच्याकडे आला व त्याला विनंती करून म्हणाला 'प्रभूजी', माझा चाकर पक्षघातानें अतिशय पीडित होऊन घरांत पडला आहे. तो त्याला म्हणाला मी येऊन त्याला बरे करीन.'' मत्तय ८:५-७

''ते त्याला म्हणाले, प्रभूजी, आमचे डोळे उघडावेत! तेव्हां येशूला कळवळा येऊन त्यानें त्यांच्या डोळ्यांस स्पर्श केला; तेव्हां त्यांस तत्काळ दिसूं लागलें आणि ते त्याच्यामागून चालू लागले.'' मत्तय २०: ३३-३४

''परंतु वारा पाहून तो भ्याला, आणि बुडू लागला असतां ओरडून म्हणाला, प्रभुजी, मला वाचवां! येशूनें तत्क्षणीं हात पुढें करून त्याला धरलें व म्हटले, अरे अल्पविश्वासी तूं संशय कां धरिलास?'' मत्तय १४: ३०-३१

'' मागा म्हणजे तुम्हांस दिलें जाईल, शोधा म्हणजे तुम्हांस सापडेल, ठोका म्हणजे तुमच्यासाठी उघडलें जाईल;'' मत्तय ७:७

''तेव्हां येशूनें तिला उत्तर दिलें, बाई, तुझा विश्वास मोठा, तुझी इच्छा सफळ होवो.'' मत्तय १५:२८

## भाग सातवा
# येशू पाप क्षमा करितो आणि लोकांस बरे करितो...
### २४. येशू पाप क्षमा करतो.

"तेव्हा त्यांचा विश्वास पाहून तो म्हणाला, हे मनुष्या तुझ्या पापांची क्षमा झाली आहे. तेव्हां शास्त्री व परूशी असा विचार करूं लागले की, हा दूर्भाषण करणारा कोण आहे! केवळ देवावाचून पापांची क्षमा कोण करू शकतो! येशूनें त्यांचे विचार ओळखून त्यांस उत्तर दिले, तुम्ही आपल्या मनांत असले विचार कां करीत आहांत? तुझ्या पापांची क्षमा झाली आहे, किंवा उठून चाल, ह्यातून कोणते म्हणणें सोपें? परंतु पृथ्वीवर पापांची क्षमा करावयास मनुष्याच्या पुत्राला अधिकार आहे. हें तुम्हांस समजावें म्हणून मी तुला सांगतों, ऊठ, आपली बाज उचलून घेऊन आपल्या घरी जा. तेव्हां तो लागलाच त्यांच्या समक्ष उठून ज्यावर तो पडून होता तें ठचलून घेऊन देवाचा महिमा वर्णित आपल्या घरी गेला." लूक : ५:२०-२५

" येशू तिला म्हणाला, मीहि तुला दंड ठरवीत नाहीं; जा; यापुढे पाप करू नको. योहान ८:११

"तेव्हां येशू म्हणाला, हे बापा, त्यांना क्षमा कर; कारण ते काय करितात हें त्यांना समजत नाही." लूक २३:३४

"हे आपला तारणारा देव, ह्याच्या दृष्टीनें चांगले व स्विकारावयास योग्य आहे. त्याची अशी इच्छा आहे कीं, सर्व माणसांचें तारण व्हावें." तीमथ्याला पहिलें पत्र २:३-४

"देवानें आपल्या पुत्राला जगाचा न्यायनिवाडा करण्यासाठी नव्हे, तर त्याच्याद्वारे जगाचे तारण व्हावें म्हणून पाठविलें." योहान: ३:१७

**२५. येशू लोकांस बरे करीतो.**

"नंतर येशू पेत्राच्या घरात गेल्यावर त्याची सासू तापानें पडली आहे असें त्याने पाहिलें. तेव्हां त्यानें तिच्या हाताला स्पर्श केला व तिचा ताप निघाला; आणि ती उठून त्याची सेवा करूं लागली. मग संध्याकाळ झाल्यावर लोकांनी पुष्कळ भूतग्रस्तांना त्याच्याकडे आणिलें; तेव्हां त्यानें भूतें शब्दानेंच घालविली व सर्व दुखणाइतांना बरें केले." मत्तय: ८:१४-१६

"तेव्हां जे नाना प्रकारचे रोग आणि व्यथा ह्यांनीं पीडलेले होते, जे भूतग्रस्त फेंफरेकरी व पक्षघाती होते अशा सर्व दुखणाइतांना त्याच्याकडे आणिले - आणि येशूनें त्यांना बरे केले." मत्तय ४:२४



## भाग आठवा

## येशू लोकांस देवाकडे चालवितो आणि तेही जीवनभर...

२६. जसा ''उत्तम मेंढपाळ'' तसा येशू लोकांस देवाकडे चालवितो: जो पिता, पुत्र आणि पवित्र आत्मा ( त्रैक्य देव - एकत्वात त्रैक्यत्व, तीन व्यक्ती - त्रैक्य. )

''मीच उत्तम मेंढपाळ आहे; उत्तम मेंढपाळ मेंढराकरितां आपला प्राण देतो.'' योहाना १०:११

''येशूने त्याला म्हटलें, मार्ग, सत्य व जीवन मीच आहें; माझ्याद्वारें आल्यावांचून पित्याकडे कोणी येत नाहीं, मी कोण आहें हें तुम्हीं ओळखलें असतें तर माझ्या पित्यालाहि ओळखलें असतें; आतांपासून पुढें तुम्हीं त्याला ओळखतां व तुम्हीं त्याला पाहिलेंहि आहे. फिलिप्प त्याला म्हणाला, प्रभूजी आम्हांला पिता दाखवा. म्हणजे आम्हांला पुरें आहे. येशूनें त्याला म्हटलें, फिलिप्पा मी इतका काळ तुम्हाहिजवळ असूनहि तु मला ओळखीत नाहींस काय? ज्यानें मला पाहिले आहे त्यानें पित्याला पाहिलें आहे.'' योहान १४:६-९

''मी आणि पिता एक आहोत.'' (योहान १०:३०)

''मी पित्याला विनंती करीन, मग तो तुम्हांला दुसरा कैवारी म्हणजे सत्याचा आत्मा देईल; अशासाठीं कीं, त्यांनें तुम्हांबरोबर सदासर्वदा रहावें तो देव आत्मा आहे. देवाने सत्य प्रगट केले आहे.'' योहान १४:१६-१७

"तरी ज्याला पिता माझ्या नांवानें पाठवील तो 'कैवारी' म्हणजे पवित्र आत्मा तुम्हाला सर्व कांही शिकवील. आणि ज्या गोष्टी मी तुम्हांला सांगितल्या त्या सर्वांची तुम्हांस आठवण करून देईल." योहान १४:२६

"तेव्हां तुम्ही जाऊन सर्व राष्ट्रांतील लोकांस शिष्य करा; त्यांस पित्याच्या, पुत्राच्या व पवित्र आत्म्याच्या नावाने बाप्तिस्मा द्या. जे काही मी तुम्हाला आज्ञापिले ते सर्व त्यांस पाळावयास शिकवा." मत्तय २८: १९-२०

"आपला देव परमेश्वर हा अनन्य परमेश्वर आहे; आणि 'तू आपला देव परमेश्वर ह्याच्यावर संपूर्ण मनानें, संपूर्ण जीवानें, संपूर्ण बुद्धीनें व संपूर्ण शक्तीनें प्रिति कर. मार्क १२:२९-३१



**२७. केवळ त्याच्या वचनाद्वारे, येशू त्याच्या लोकांना जीवनभर चालवितो.**

"माझी मेंढरे माझी वाणी ऐकतात; मी त्यांना ओळखतों व तीं माझ्यामागे येतात. योहान १०:२७"

"तुला पवित्र शास्त्राची माहिती आहे हें तुला ठाऊक आहे; तें ख्रिस्त येशूमधील विश्वासाच्या द्वारें तुला तारणासाठी ज्ञानी करावयाचा समर्थ आहेत. प्रत्येक परमेश्वरप्रेरित शास्त्रलेख सद्‌बोध, दोष दाखविणें, सुधारणुक, नीतिशिक्षण ह्यांकरितां उपयोगी आहे." तिमाथ्याला दुसरे पत्र ३:१५-१६)

"मग येशू आपल्या शिष्यांना म्हणाला, माझ्या मागे येण्याची कोणाची इच्छा असेल तर त्यांने स्वतःचा त्याग करावा व आपला वधस्तंभ उचलून घेऊन मला अनुसरावे. कारण जो कोणी आपला जीव वाचवूं पाहतो, तो आपल्या जीवाला मुकेल. आणि जो कोणी माझ्याकरितां आपल्या जीवाला मुकेल त्याला तो मिळेल." मत्तय १६: २४-२५

"मी तर त्यांना जीवनप्राप्ती व्हावी व विपुलपणें व्हावी म्हणून आलो आहे." योहान १०:१०

"मी त्यांना सार्वकालिक जीवन देतो; त्यांचा कधीहिं नाश होणार नाही आणि त्यांना माझ्या हातातून कोणी हिसकून घेणार नाही." योहान १०:२८

"माझा आनंद तुम्हांमध्यें असावा व तुमचा आनंद परिपूर्ण व्हावा म्हणून मीं तुम्हांला ह्या गोष्टी सांगितल्या आहेत." योहान १५:११

# भाग नववा

## येशू जगाला तारण पुरवितो.

### २८. येशूनें त्याचे जीवन सर्वांकरितां दिले.

"कारण मला जें सांगण्यांत आलें तें मी तुम्हांस सांगून टाकलें. त्यापैकी मुख्य हे की, शास्त्राप्रमाणे ख्रिस्त तुमच्याआमच्या पापाबद्दल मरण पावला. करिंथकरांस पहिले पत्र १५:३

"कोणी तो माझ्यापासून घेत नाही, तर मी होऊनच तो देतो." योहान १०:१८

"मग त्यांनें त्याला त्यांच्या स्वाधीन केले, मग त्यांनी येशूला आपल्या ताब्यांत घेतले, आणि तो आपला वधस्तंभ स्वत: वाहत कंवटीचें स्थान म्हटलेल्या जागी गेला. (त्या जागेला इब्री भाषेंत गुलगुथा म्हणतात.) तेथे त्यांनी त्याला व त्याच्याबरोबर दुसऱ्या दोघांना, एकाला एका बाजूस व दुसऱ्याला दुसऱ्या बाजूस आणि येशूला मध्यें, वधस्तंभावर खिळले." योहान १९:१६-१८

"ह्यानंतर, आता सर्व पूर्ण झालें आहे. हे जाणून येशूनें शास्त्रलेख पूर्ण व्हावा म्हणून, 'मला तहान लागली आहे', असे म्हटलें. तेथे आंब भरून ठेवलेलें एक भांडें होतें; म्हणून त्यांनी आंब भरलेला स्पंज एजोब झाडाच्या काठीवर बसवून त्याच्या तोंडाला लावला येशूनें आंब घेतल्यानंतर, 'पूर्ण झाले आहे' असें म्हटलें; आणि मस्तक लववून आपला प्राण सोडला." योहान १९:२८-३०

"तोच सर्वांसाठी ह्याकरितां मेला." करिंथकरांस दुसरे पत्र ५:१५

"परंतु देव आपणांवरच्या स्वत:च्या प्रीतीचें प्रमाण हें


देतो की, आपण पापी असतांनाच ख्रिस्त सुवेळी आपणांसाठी मरण पावला.'' रोमकरांस पत्र ५:८

''कारण वाडवडिलांच्या परंपरेनें चालत आलेल्या तुमच्या निरर्थक वागणुकीपासून, 'सोनें, रूपे' अशा नाशवंत वस्तुंनी नव्हे तर निष्कलंक व निर्दोष कोंकरा असा जो ख्रिस्त, त्याच्या मूल्यवान रक्ताने 'तुम्ही मुक्त झाला आहां.'' पेत्राचे पहिले पत्र १:१८-१९

''हा पाहा, जगाचें पाप हरण करणारा देवाचा कोंकरा! योहान १:२९

**२९. देवावरील आपल्या विश्वासाचा उद्देश हा येशू आहे.**

''देवानें जगावर एवढी प्रीति केली की, त्यांनें आपला एकूलता एक पुत्र दिला, अशासाठी की, जो कोणी त्याच्यावर विश्वास ठेवतो त्याचा नाश होऊ नये तर त्याला सार्वकालिक जीवन प्राप्त व्हावे.'' योहान ३: १६



"आपण आपल्या विश्वासाचा उत्पादक व पूर्ण करणारा येशू ह्याच्याकडे पाहत असावें." इब्री लोकांस पत्र: १२:२

**३०. येशू आम्हास अंधःकारापासून आणि नाशापासून मुक्त करतो.**

"त्यानें आपल्याला अंधाराच्या सत्तेंतून काढून आपल्या प्रिय पुत्राच्या राज्यात आणून ठेवलें. त्या पुत्राच्या ठायी, खंडणी भरून प्राप्त केलेली मुक्ति म्हणजे आपल्या पापांची क्षमा आपल्याला मिळाली आहे." कलसैकरांस पत्र १:१३-१४

"म्हणून ख्रिस्त येशूमध्यें असलेल्यांना दंडाज्ञा नाहीच." रोमकरांस पत्र ८:१

"जो माझे वचन ऐकतो आणि ज्याने मला पाठविले त्याच्यावर विश्वास ठेवतो त्याला सार्वकालिक जीवन प्राप्त झालें आहे; आणि त्याच्यावर न्यायाचा प्रसंग येणार नाही, परंतु तो मरणांतून जीवनांत पार गेला आहे." योहान ५:२४

**३१. येशू आपल्या पापांची क्षमा करीतो आणि आपणाला शुद्ध करीतो.**

"तेव्हां त्यांचा विश्वास पाहून तो म्हणाला, हे मनुष्या, तुझ्या पापांची क्षमा झाली आहे." लूक ५:२०

"म्हणून येशूनेंहि स्वरक्तानें लोकांना पवित्र करावें म्हणून वेशीबाहेर मरण सोसले." इब्री लोकांस पत्र १३:१२

"त्याचा पुत्र, येशू ह्याचें रक्त आपल्याला सर्व पापांपासून शुद्ध करीतें." योहानाचें पहिलें पत्र १:७

**३२. येशू आम्हांस "अपराध करू नये" म्हणून स्पष्ट सांगतो.**

"पण पुष्कळ अपराधामुळें तें कृपादान झालें. यासाठी की "अपराध करू नये.!" रोमकरांस पत्र ५:१६

## ३३. येशूसह आंम्ही अध्यात्मिकरित्या जीवंत आहोत.

"तरी देव दयासंपन्न आहे. म्हणून आपण आपल्या अपराधामुळे मृत झालेले असतांनाही त्यांनें आपल्यावरील स्वत:च्या अपरंपार प्रेमामुळें, ख्रिस्ताबरोबर आपणांला जीवंत केले." इफिसकरांस पत्र २:४-५

"कारण तुम्ही नाशवंत बीजापासून नव्हे, तर अविनाशी बीजापासून म्हणजे 'देवाच्या जीवंत व टिकणाऱ्या' शब्दाच्या द्वारें पुन्हा जन्म पावले आहां." पेत्राचें पहिलें पत्र १-२३

"परंतु जेव्हां आपला तारणारा देव ह्याची दया व मनुष्यांवरील प्रेम प्रगट झालें तेव्हां आपण केलेल्या नीतीच्या कृत्यांनीं नव्हें तर नव्या जन्माचें स्नान व पवित्र आत्म्यानें केलेलें नवीकरण ह्याच्याद्वारें त्यांनें आपल्या दयेनुसार आपणांस तारीलें." तीताला पत्र ३: ४-५

## ३४. येशूवरील विश्वासाच्याद्वारे, देवाबरोबर आम्ही यथायोग्य राखले गेलो आहोत.

"म्हणून नियमशास्त्रांतील कर्मांनी कोणीही मनुष्य देवासमोर नीतीमान ठरणार नाही; कारण नियमशास्त्राच्या द्वारें पापाची जाणीव होते, आता तर नियमशास्त्राव्यतिरिक्त असें जे देवाचे नीतिमत्त्व तें प्रगट झाले आहें; त्याला मोशेच्या नियमशास्त्राची व संदेष्टयांची साक्ष आहे; हें देवाचें नीतिमत्त्व तर येशू ख्रिस्तावरील विश्वासाच्या द्वारें विश्वास ठेवणाऱ्यां सर्वांसाठीं आहे, त्यांत भेदभाव नाही. कारण सर्वांनी पाप केलें आहें आणि ते देवाच्या गौरवाला उणे पडले आहेत.

देवाच्या कृपेने ख्रिस्त येशूनें खंडणी भरून प्राप्त केलेल्या मुक्तीच्या द्वारें तें विनामूल्य नीतिमान ठरतात." रोमकरांस पत्र ३:२०-२४

"जो इसम त्याच्यावर भाव ठेवतो त्याने केलेल्या कर्माने नव्हे तर त्याने देवावर विश्वास ठेवला, त्याला निर्दोष ठरविले, ते त्याला, त्याच्या विश्वासाने देव स्वत:च्या दृष्टीने त्याला नीतिमान ठरवितो." रोमकरांस पत्र ४:५

ख्रिस्ताला पाप ठाऊक नव्हतें. त्याला त्यानें तुमच्या आमच्याकरितां पाप असें केलें; ह्यासाठी की, आपण त्याच्या ठायी देवाचें नीतिमत्त्व व्हावें. करिंथकरांस दुसरें पत्र ५:२१

## ३५. येशूनें आम्हांस देवाच्या क्रोधापासून सोडविलें आणि त्याच्याद्वारें आपल्याला शांती मिळाली.

"त्याच्या मरणांद्वारें आता तर आपण विशेष करून त्याच्याद्वारें देवाच्या क्रोधापासून तारले जाणार आहो." रोमकरांस पत्र ५:९

"म्हणून आपण विश्वासानें नीतिमान ठरविलेले आहों म्हणून आपणांला आपल्या प्रभू येशू ख्रिस्ताच्या द्वारें देवाबरोबर शांति आहे." रोमकरांस पत्र ५:१

## ३६. येशूनें सैतान आणि त्याच्या मरणावरच्या सत्तेतून विजय मिळविला आहे.

"ज्याअर्थी 'मुले' एकाच रक्तामांसाची होती त्याअर्थी तोहि त्यांच्यासारखा रक्तामांसाचा झाला, हेतु हा कीं, ह्याला मरणानें शून्यवत करावें; आणि जे मरणाच्या भयानें आयुष्यभर दास्याच्या बंधनात होतें त्या सर्वांना मुक्त करावें." इब्री लोकांस पत्र २:१४-१५

## ३७. येशू आम्हांबरोबर मैत्री जोडतो.

"कारण आपण शत्रू असतां देवाबरोबर त्याच्या पुत्राच्या मृत्यूद्वारे आपला समेट झाला आहे." रोमकरांस पत्र ५:१०

"त्या तुमचा आतां त्यानें स्वत:च्या रक्तामांसाच्या देहांत मरणाच्या द्वारें समेट केला आहे, ह्यासाठी कीं त्यानें तुम्हांस पवित्र, निष्कलंक, व निर्दोष असें आपणांसमोर उभें करावें." कलस्सैकरांस पत्र १:२२

## ३८. येशू आम्हांस स्वत:चे असे म्हणून निवडतो.

"तुम्हीं मला निवडलें नाहीं, तर मी तुम्हाला निवडलें आहें" योहान १५:१६

"पण तुम्हीं तर 'निवडलेला वंश', राजकीय याजकगण, पवित्र राष्ट्र, 'देवाचे स्वत:चे लोक' असे आहां; ह्यासाठी कीं, ज्यांनें तुम्हांस अंधकारांतून काढून आपल्या अद्भूत प्रकाशांत पाचारण केलें 'त्याचे गुण तुम्ही प्रसिद्ध करावें." पेत्राचें पहिलें पत्र २:९

"तुम्ही मोलानें विकत घेतलेले आहां; माणसांचे गुलाम होऊं नका." करिंथकरांस पहिले पत्र ७:२३

## ३९. येशू आम्हावर प्रेम करीतो.

"आपल्या मित्रांकरितां आपला प्राण द्यावा, ह्यांपेक्षा कोणाची प्रीति मोठी नाहीं." योहान १५:१३

"मीहि तुम्हांवर प्रीति केली आहे." योहान १५:९

## ४०. येशू आम्हांस बरें करीतो.

"त्याला बसलेल्या मारानें तुम्ही निरोगी झाला आहांत." पेत्राचें पहिलें पत्र २:२४

## ४१. येशू आम्हाला आनंद देतो.

"माझा आनंद तुम्हांमध्यें असावा व तुमचा आनंद परिपूर्ण व्हावा म्हणून मी तुम्हांला ह्या गोष्टी सांगितल्या आहेत." योहान १५:११

"ते असें: ज्यांच्या अपराधांची क्षमा झाली आहें व ज्यांच्या पापांवर पांघरूण घातलें आहें ते धन्य." रोमकरांस पत्र ४:७

"जी गौरवयुक्त कृत्ये त्याच्याकडून होत होती त्या सर्वांमुळें सर्व लोकसमुदायाला आनंद झाला." लुक १३:१७

"तर तुमची नांवे स्वर्गांत लिहिलेलीं आहेत ह्याचा आनंद माना." लूक १०:२०

## ४२. येशू स्वर्गात आम्हांसाठी जागा तयार करीत आहे.

"माझ्या पित्याच्या घरांत राहण्याच्या जागा पुष्कळ आहेत; नसत्या तर मी तुम्हांला तसें सांगितले असते; मी तुम्हांसाठी जागा तयार करावयास जातो." योहान १४:२

## ४३. येशू त्यांच्या लोकांस सार्वकालिक जीवन पुरवितो.

"कारण पापाचें वेतन मरण आहे, पण देवाचें कृपादान आपल्या प्रभू येशू ख्रिस्तांमध्यें सार्वकालिक जीवन आहे." रोमकरांस पत्र ६:२३

"मी त्यांना सार्वकालिक जीवन देतों; त्यांचा कधीही नाश होणार नाहीं आणि त्यांना माझ्या हातातून कोणी हिसकून घेणार नाहीं." योहान १०:२८

"येशूनें तिला म्हटलें, पुनरुत्थान व जीवन मीच आहे; जो माझ्यावर विश्वास ठेवतो तो मेला असला तरी जगेल; आणि जिवंत असलेला प्रत्येक जण जो माझ्यावर विश्वास

ठेवतो तो कधींही मरणार नाहीं, हे तूं खरे मानतेस काय?'' योहान ११:२५-२६

''येशू त्याला म्हणाला मी तुला खचित सांगतों, तूं आज माझ्याबरोबर सुखलोकांत असशील.'' लूक २३:४३

### ४४. येशू जगाकरितां तारण पुरवितो.

''देवानें जगावर एवढी प्रीती केली की, त्यानें आपला एकूलता एक पुत्र दिला, अशासाठी की, जो कोणी त्याच्यावर विश्वास ठेवतों त्याचा नाश होऊ नयें तर त्याला सार्वकालिक जीवन प्राप्त व्हावे.'' योहान ३:१६

''आणि तारण दुसऱ्या कुणाकडून नाही; कारण जेणेंकरून आपलें तारण होईल असें दुसरें कोणतेंही नांव आकाशाखाली मनुष्यांमध्यें दिलेलें नाही.'' प्रेषितांचीं कृत्यें ४:१२

''येशूनें त्याला म्हटलें आज ह्या घराला तारण प्राप्त झालें आहें.'' लूक १९:९

## येशू त्याच्या लोकांस नवीन जीवन आणितो.

### ४५. येशू मरणातून उठला आहे आणि त्याच्या अनुयायींना प्रकट झाला आहे.

"येशूनें तिला म्हटलें, बाई, कां रडतेस? कोणाचा शोक करितेंस? तो माळी आहे असें समजून ती त्याला म्हणाली, दादा, तूं त्याला येथून नेलें असलें तर त्याला कोठें ठेवलेंस मला सांग. म्हणजे मी त्याला घेऊन जाईन. येशूनें तिला म्हटलें मरिये! ती वळून त्याला इब्रीभाषेंत म्हणाली, रब्बूनीं! (म्हणजे गुरुजी!)" योहान २०: १५-१६



"तो येथें नाहीं; कारण त्यानें सांगितल्याप्रमाणें तो उठला आहे. या, तो निजला होता तें हें स्थळ पाहा. आणि लवकर जाऊन त्याच्या शिष्यांस सांगा कीं, तो मेलेल्यांतून उठला आहें; पाहा, तो तुमच्या आधीं गालिलांत जात आहें, तेथें तो तुमच्या दृष्टीस पडेल; पाहा, मी तुम्हांस हें सांगितलें आहें तेव्हां त्या स्त्रिया भितीनें व हर्षातिशयानें कबरेपासून लवकर निघून त्याच्या शिष्यांस हें वर्तमान सांगावयास धावत गेल्या. मग पाहा, येशू त्यांस भेटून म्हणाला, कल्याण असो. त्यांनीं जवळ जाऊन त्याचे चरण धरून नमन केलें. मत्तय २८:६-९

"मरण सोसल्यानंतरही त्यांने त्यांना पुष्कळ प्रमाणांनीं आपण जिवंत आहों हें दाखविलें. चाळीस दिवसपर्यंत तो त्यांना दर्शन देत असे व देवाच्याराज्याच्या गोष्टी सांगत असें." प्रेषितांचीं कृत्यें १:३

"कारण मला जे सांगण्यांत आलें तें मी तुम्हांस सांगून टाकलें, त्यापैकीं मुख्य हें कीं, शास्त्राप्रमाणें ख्रिस्त तुमच्याआमच्या पापांबद्दल मरण पावला; तो पुरला गेला; शास्त्रांप्रमाणें तिसऱ्या दिवशीं त्याला पुन्हा उठविण्यांत आलें. आणि तो केफाला, मग बारा जणांना दिसला, त्यानंतर तो एकदम पाचशेंपेक्षां अधिक बंधूंना दिसला." करिंथकरांस पहिलें पत्र १५: ३-६

"आणि जणूं काय अकालीं जन्मलेला जो मीं, त्या मलाहिं सर्वांच्या शेवटीं दिसला." करिंथकरांस पहिले पत्र १५:८

**४६. येशूचें पुनरुत्थान याद्वारे त्याच्या लोकांस नवीन जीवनात आणितो.**

"मी जीवंत आहें म्हणून तुम्हींहि जीवंत रहाल." योहान १४:१९

"देवानें आपल्या एकूलत्या एक पुत्राला जगांत पाठविलें

आहें, ह्यासाठी कीं, त्याच्या द्वारें आपणांस जीवन प्राप्त व्हावें. ह्यावरून देवाची आपल्यावरील प्रीति प्रगट झाली. प्रीति म्हणावी तर हीच; आपण देवावर प्रीती केली असें नाहीं, तर त्यानें तुम्हांआम्हांवर प्रीति केली. आणि तुमच्याआमच्यां पापांचे प्रायश्चित व्हावें म्हणून स्वपुत्राला पाठविलें." प्रियजनहों, देवानें जर आपल्यावर अशा प्रकारें प्रीति केली तर आपणहि एकमेकांवर प्रीति केली पाहिजे." योहानाचे पहिलें पत्र ४: ९-११

"म्हणून ह्यापुढें मी जगतों असें नाहीं, तर ख्रिस्त माझ्याठायीं जगतों." गलतीकरांस पत्र २:२०

"कारण, पापाचें वेतन मरण आहे पण देवाचें कृपादान आपल्या प्रभू येशू ख्रिस्तामध्यें सार्वकालिक जीवन आहें." रोमकरांस पत्र ६:२३

"दुसरी कोणतीही सृष्ट वस्तू, ख्रिस्त येशू आपला प्रभू ह्याच्यामध्यें देवाची आपल्यावरील जी प्रीति आहे तिच्यापासून आपल्याला विभक्त करावयाला समर्थ होणार नाहीं." रोमकरांस पत्र ८:३९

"उलटपक्षी, ज्यांनें आपणांवर प्रीति केली त्याच्या योगें ह्या सर्व गोष्टींत आपण महाविजयी ठरतों." रोमकरांस पत्र ८: ३७

"तर मग ह्या गोष्टींवरून आपण काय म्हणावें? देव आपणांला अनुकूल असल्यास आपणांला प्रतिकूल कोण? ज्यानें आपल्या स्वतःच्या पुत्रास राखून न ठेवता त्याला आपणां सर्वांकरितां समर्पण केलें, तो त्याच्याबरोबर आपल्याला सर्व कांहीं कसें देणार नाहीं." रोमकरांस पत्र ८:३१-३२

"म्हणून ख्रिस्त येशूमध्यें असलेल्यांना दंडाज्ञा नाहींच." रोमकरांस पत्र ८:१

"तो सर्वांसाठीं ह्याकरितां मेला कीं, जे जगतात त्यांनीं पुढें स्वतःकरितां नव्हे तर त्यांच्यासाठी जो मेला व पुन्हा उठला त्याच्याकरितां जगावें" करिंथकरांस दुसरे पत्र ५:१५

"माझ्या पित्याच्या घरांत रहाण्याच्या जागा पुष्कळ आहेत; नसत्या तर मीं तुम्हांला तसें सांगितलें असतें; मी तुम्हांसाठीं जागा तयार करायला जातों; आणि मीं जाऊन तुम्हांसाठीं जागा तयार केली म्हणजे पुन्हा येऊन तुम्हांला आपल्याजवळ घेईन; ह्यासाठी कीं, जेथें मी आहें तेंथें तुम्हींहि असावें" योहान १४:२-३

"तो त्याला म्हणाला, मी तुला खचित सांगतों, तूं आज माझ्याबरोबर सुखलोकांत असशील." लूक २३:४३

"आपल्या प्रभू येशू ख्रिस्ताचा देव व पिता, धन्यवादित असो. जिवंत आशा प्राप्त होण्यासाठीं आणि अविनाशी निर्मळ व अक्षय वतन मिळण्यासाठीं, त्यानें आपल्या महा दयेनुसार येशू ख्रिस्ताच्या मृतांतून पुनरूत्थानाच्या द्वारें आपल्याला पुन्हा जन्म दिला." पेत्राचे पहिले पत्र १:३-४

"त्याला पाहिले नसतांहीं त्याच्यावर तुम्ही प्रीति करीतां, आतां तो दिसत नसतां त्याच्यावर विश्वास ठेवतां; आणि त्या विश्वासाचें पर्यवसान जें आपल्या जीवांचे तारण तें उपभोगीत अनिर्वाच्य गौरवयुक्त आनंदानें उल्लासतां." पेत्राचें पहिलें पत्र १:८-९

## भाग अकरावा
## येशू त्याची मंडळी उभारतो.

**४७. येशू त्याची मंडळी बांधतो.**

"मी आपली मंडळी रचीन." मत्तय १६:१८

**४८. येशू स्वयं प्रगट व्हावयास देवाचे वचन उपयोगात आणितो.**

"मग येशूनें आरंभ करून संपूर्ण शास्त्रांतील आपणा-विषयींच्या गोष्टीचा अर्थ त्यांना सांगितला." लूक २४:२७

**४९. त्याच्या वचनाद्वारें देव लोकांस त्याच्या विश्वासांत आणितो.**


"येशू हा देवाचा पुत्र ख्रिस्त आहे असा तुम्हीं विश्वास ठेवावा, आणि विश्वास ठेवून तुम्हांला त्याच्या नावानें जीवन प्राप्त व्हावें, म्हणून हीं लिहिलीं आहेत." योहान २०:३१

"आत्मा हा जीवंत करणारा आहे. देहापासून कांही लाभ नाही, मी जी वचने तुम्हांला सांगितलीं आहेत ती आत्मा व जीवन अशी आहेत." योहान ६:६३

"कारण मला सुवार्तेची लाज वाटत नाही; कारण विश्वास ठेवणाऱ्या प्रत्येकाला तारणारासाठी ती देवाचें सामर्थ्य आहें" रोमकरांस पत्र १:१६

**५०. येशू पवित्र आत्मा पाठवून त्याच्या लोकांस सामर्थ्यवान करीतो.**

"ज्याला मी पित्यापासून तुम्हांकडे पाठवीन तो कैवारी म्हणजे सत्याचा आत्मा येईल तेव्हां तो माझ्याविषयी साक्ष देईल; आणि तुम्हीहि माझ्याविषयी साक्ष द्याल." योहान १५:२६-२७



"परंतु पवित्र आत्मा तुम्हांवर येईल तेव्हां तुम्हांला सामर्थ्य प्राप्त होईल, आणि यरूशलमेंत, सर्व यहुदीयांत, शेमरोनांत व पृथ्वीच्या शेवटापर्यंत तुम्ही माझे साक्षी व्हाल." प्रेषितांची कृत्ये १:८

**५१. येशूविषयीची साक्ष शुभवार्तेद्वारा सर्वत्र जाहीर करावयास लोकांस साहाय्य करते.**

"तेव्हां त्यानें येशूविषयींची सुवार्ता त्याला सांगितली." प्रेषितांचीं कृत्यें ८:३५

"आणि दररोज मंदिरांत व घरोघर शिकविण्याचें व येशू हाच ख्रिस्त आहे ही सुवार्ता गाजविण्याचे त्यांनी सोडलें नाहीं." प्रेषितांची कृत्ये ५:४२

"ही त्याची कीर्ति लागलीच गालीलाच्या चहुंकडल्या सर्व प्रांतांत पसरली." मार्क १:२८

तेव्हां तुम्ही जाऊन सर्व राष्ट्रांतील लोकांस शिष्य करा. मत्तय २८:१९

**५२. येशूची मंडळी वाढविली जातें.**

"मग देवाच्या वचनाचा प्रसार होत गेला; यरूशलेमेंत शिष्यांची संख्या फार वाढत गेली." प्रेषितांचीं कृत्यें ६:७

"आणि प्रभू तारण प्राप्त होत असलेल्या माणसांची दररोज त्यांच्यात भर घालीत असे." प्रेषितांचीं कृत्यें २: ४७

"आणि त्यानेंच कोणी प्रेषित, कोणीं संदेष्टें, कोणी सुवार्तिक, कोणी पाळक व शिक्षक असे नेमून दिले. तें ह्यासाठीं कीं, त्यांनी पवित्र जनांस सेवेच्या कार्याकरितां व ख्रिस्ताच्या शरीराची रचना पूर्णतेस नेण्याकरितां सिद्ध करावें." इफिसकरांस पत्र ४: ११-१२

**५३. विश्वासणाऱ्यांस ख्रिस्ती म्हणून पाचारण केलेले आहे.**

"शिष्यांना ख्रिस्ती हें नांव पहिल्यानें अंत्युखियांत मिळालें." प्रेषितांची कृत्ये ११:२६

**५४. ख्रिस्ती लोक येशूविषयींचीं अधिकाधिक माहिती करून घेतात.**

"आपला प्रभू व तारणारा येशू ख्रिस्त ह्याच्या कृपेंत व ज्ञानांत वाढत जा." पेत्राचे दुसरे पत्र ३:१८

## भाग बारावा

## येशू त्याच्या लोकांस स्वर्गात घेणार आहे.

**५५. येशू गौरवाने व सामर्थ्याने स्वर्गात विराजमान झालेला आहे.**

"असे सांगितल्यावर त्यांच्या डोळ्यांदेखत तो स्वर्गात घेतला गेला; आणि मेघाने त्याला त्यांच्या दृष्टिआड केले" प्रेषितांचीं कृत्यें १:९

"जो बसलेला होता त्याचे मुख दिसण्यांत यास्फे व सादि ह्या रत्नांसारखा होता, 'राजासनाभोवती' दिसण्यांत पाचेसारखें मेघधनुष्य होतें." प्रकटीकरण ४:३

येशू म्हणाला "स्वर्गात आणि पृथ्वीवर सर्व अधिकार मला दिलेला आहे." मत्तय २८:१८


**५६. येशू पुन्हा येईल.**

"हा जो येशू तुम्हांपासून वर स्वर्गात घेतला गेला आहे तोच, तुम्हीं त्याला जसें आकाशांत जातांना पाहिलें, तसाच येईल" प्रेषितांची कृत्यें १:११

"पाहा, तो मेघांसहित येतो! प्रत्येक डोळा त्याला 'पाहील" प्रकटीकरण १:७

"कारण जशी वीज पूर्वेकडून निघून पश्चिमेपर्यंत चकाकत जाते तसें मनुष्याच्या पुत्राचे येणे होईल" मत्तय २४:२७

"जो धन्य एकच अधिपति राजांचा राजा व प्रभुचा प्रभु, त्यांचे प्रगट होणे देव यथाकाळी दाखविल." तीमथ्याला पहिलें पत्र ६:१५



"येशूनें म्हटलें, पाहा! मी' लवकर 'येतो'!" प्रकटीकरण २२:७

**५७. त्याच्या येण्याच्या समयी येशू मेलेल्यांस उठविल.**

"मी तुम्हांला खचित खचित सांगतो की, मेलेले लोक देवाच्या पुत्राची वाणी ऐकतील व जे ऐकतील ते जिवंत होतील." योहान ५:२५

**५८. येशू त्याच्या लोकांस गौरवात बदलून टाकील.**

"पाहा, मी तुम्हांस एक रहस्य सांगतों; आपण सर्वच महानिद्रा घेणार नाहीं, तरी आपण सर्वजण बदलून जाऊं; क्षणांत, निमिषांत, शेवटला कर्णा वाजेल तेव्हां; कारण कर्णा वाजेल, मेलेले ते अविनाशी असे उठविले जातील, आणि आपण बदलून जाऊं. कारण हें जें विनाशी त्यानें अविनाशीपण परिधान करावें, आणि हें जें मर्त्य त्यानें अमरत्व परिधान करावें हें आवश्यक आहे." करिंथकरांस पहिले पत्र १५:५१-५३

"आपलें नागरिकत्व तर स्वर्गात आहे; तेथून प्रभू येशू ख्रिस्त हा तारणारा येणार आहे, त्याची आपण वाट पहात आहों, ज्या सामर्थ्यानें तो सर्व काहीं आपल्या स्वाधिन करण्यास समर्थ आहे. त्या सामर्थ्याने तो तुमचें आमचें दैनावस्थेंतील शरीर स्वतःच्या गौरवावस्थेंतील शरीरासारखें व्हावें म्हणून त्याचें रूपांतर करील." फिलीप्पैकरांस पत्र ३:२०-२१

"प्रियजनहों, आपण आतां देवाची मुलें आहों; आणि

पुढें आपण काय होऊं हें अजून प्रगट झालेलें नाहीं; तरी तो प्रगट होईल तेंव्हां आपण त्याच्या सारखे होऊं हें आपल्याला माहित आहें, कारण जसा तो आहे तसाच तो आपल्याला दिसेल.'' योहानाचें पहिलें पत्र ३:२

**५९. जेंव्हा येशू प्रगट होईल, वर्तमानकाळची सृष्टी नष्ट होईल, आणि देव सर्वकाही नवें तयार करील.**

''तरी चोर येतो तसा प्रभूचा दिवस येईल; त्यादिवशी आकाश मोठा नाद करीत, नाहींसें होईल. सृष्टीतत्त्वें तप्त होऊन लयास जातील, आणि पृथ्वी व तिच्यावरील गोष्टी उघडकीस येतील.'' पेत्राचे दुसरे पत्र ३:१०

''तरी ज्यामध्यें नीतिमत्व वास करीतें असें नवे आकाश व नवी पृथ्वी ह्यांची त्याच्या वचनाप्रमाणें आपण वाट पहात आहो. पेत्राचे दुसरे पत्र ३:१३

''तेव्हां राजासनावर बसलेला' म्हणाला पाहा, मी' सर्व, गोष्टी नवीन करीतों. तो म्हणाला, लिही; कारण हीं वचने विश्वसनीय व सत्य आहेत.'' प्रकटीकरण २१:५

**६०. येशू त्याच्या लोकांकरितां स्वर्गात जागा तयार करतो आहे.**

''माझ्या पित्याच्या घरांत राहाण्याच्या जागा पुष्कळ आहेत. मी तुम्हांसाठीं जागा तयार करावयास जातों.'' योहान १४:२

''नंतर मीं 'नवें आकाश व नवी पृथ्वी' हीं पाहिलीं; पहिलें आकाश व पहिली पृथ्वी हीं निघून गेलीं होतीं आणि

समुद्रही राहिला नाहीं. तेव्हां मीं 'पवित्र नगरी' नवी यरूशलेम, देवापासून स्वर्गातून उतरतांना पाहिली, ती नवऱ्यासाठीं, 'शृंगारलेल्या नवरीप्रमाणें' सजविलेली होती; आणि मी राजासनांतून आलेली मोठी वाणी ऐकली, ती अशीं 'पाहा', देवाचा 'मंडप' मनुष्याजवळ आहे, त्यांच्याबरोबर 'देव' आपली वस्ती करील; ते त्याचे लोक होतील, आणि देव स्वत: 'त्यांच्याबरोबर राहिल' 'तो' त्यांच्या डोळ्यांचें सर्व 'अश्रू' पुसून टाकील, ह्यापुढें मरण नाहीं; 'शोक' 'रडणें' व कष्ट हीं नाहींत कारण पहिल्या गोष्टी होऊन गेल्या." प्रकटीकरण २१:१-४

"तेव्हां मी आत्म्यानें संचरित झालों असतां त्यानें 'मला' मोठ्या उंच डोंगरांवर नेलें', आणि पवित्र नगरी यरूशलेम देवापासून स्वर्गातून उतरतांना दाखविली. तिच्या ठायीं 'देवाचे तेज' होतें; तिची कांति, अति मौलवान, रत्नासारखी होती; ती स्पटिकाप्रमाणें लखलखणाऱ्या यास्फे खड्यासारखी होती." प्रकटीकरण २१:१०-११

"नगरीतील मार्ग पारदर्शक काचेंसारखा शुद्ध सोनेंच होता." प्रकटीकरण २१:२१

"त्यांत मंदिर माझ्या पाहण्यांत आलें नाहीं; कारण सर्व समर्थ प्रभू देव व कोंकरा हेच तिचें मंदिर होते नगरीला 'सूर्यचंद्राच्या प्रकाशाची' आवश्यकता नाहीं; कारण 'देवाच्या तेजानें' ही प्रकाशित केली आहे; आणि हाच कोंकरा तिचा दीप." प्रकटीकरण २१:२२-२३

''नंतर त्यानें देवाच्या व कोंकऱ्याच्या राजासनांतून 'निघालेली' नगरीच्या मार्गावरून वाहाणारी जीवनाच्या पाण्याची स्फटिकासारखी 'नितळ नदी' मला दाखविली. नदीच्या 'दोन्हीं बाजूस' बारा जातींचीं फळें देणारें जीवनाचें झाड होतें.'' प्रकटीकरण २२:१-३

## ६१. येशू वैयक्तिकरित्या त्याच्या लोकांस स्वर्गात घेईल.

''मी पुन्हां येऊन तुम्हांला आपल्याजवळ घेईन; ह्यासाठी कीं, जेथें मी आहें तेथें तुम्हींहि असावें.'' योहान १४:३

''जेंव्हां मनुष्याचा पुत्र आपल्या वैभवानें 'सर्व देवदुतांसह येईल', तेंव्हां तो आपल्या वैभवशाली राजासनावर बसेल; त्याच्यापुढें सर्व राष्ट्रें जमविली जातील; आणि जसे मेंढपाळ शेरडांपासून मेंढरें वेगळी करीतों तसें तों त्यांस एकमेकांपासून वेगळे करील आणि मेंढरांस तो आपल्या उजवीकडे व शेरडांस डावीकडे ठेविल तेंव्हां राजा आपल्या उजवीकडच्यांस म्हणेल, 'अहो, माझ्या पित्याचे अशीर्वादितहों, या; जें राज्य जगाच्या स्थापनेपासून तुम्हांकरितां सिद्ध केलें आहे तें वतन घ्या.'' मत्तय २५:३१-३४

''मग डावीकडच्यांसहीं तो म्हणेंल, 'अहो, शापग्रस्तहों, माझ्यापुढून निघा. आणि सैतान व त्याचे दूत ह्यांच्यासाठीं जो सार्वकालिक अग्नि सिद्ध केला आहे त्यांत जा.'' मत्तयः २५:४१
''तें, तर सार्वकालिक शिक्षा भोगावयास जातील; आणि नीतिमान 'सार्वकालिक जीवन उपभोगावयास जातील.'' मत्तय २५:४६

''येशू त्याला म्हणाला, मी तुला खचित सांगतों, तूं आज माझ्याबरोबर सुखलोकांत असशील.'' लूक २३:४३

"ह्यानंतर मीं पाहिलें तों सर्व राष्ट्रें, वंश, लोक व निरनिराळ्या भाषा बोलणारे ह्यांच्यापैकीं कोणाला मोजतां आला नाहीं असा, शुभ्र झगे परिधान केलेला व हाती झावळ्या घेतलेला, मोठा लोकसमुदाय राजासनासमोर व कोंकऱ्यासमोर उभा राहिलेला माझ्या दृष्टीस पडला. ते उच्च स्वरानें म्हणत होतें: 'राजासनांवर बसलेल्या' आमच्या देवाकडून व कोंकऱ्याकडून, तारण आहे. तेव्हां राजासन, वडीलमंडळ व चार प्राणी ह्यांच्याभोवतीं सर्व देवदूत उभे होते, ते राजासनासमोर उपडे पडून देवाला नमन करून म्हणालें: आमेन, धन्यवाद, गौरव, ज्ञान, उपकारस्तुती, सन्मान, सामर्थ्य व बळ हीं युगानुयुग आमच्या देवाचीं आहेत;" आमेन. प्रकटीकरण ७: ९-१२

## ६२. उपसंहार

"जीवन कशाकरितां आहे? कारण मला तर, जगणें हें ख्रिस्त आणि मरणें हें लाभ आहे; पण जर देहांत जगणें हें माझ्या कामाचें फळ आहें तर कोणतें निवडावें हें मला समजत नाहीं. मी ह्या दोहोंसंबंधानें पेचांत आहें; येथून सुटून जाऊन ख्रिस्ताजवळ असण्याची मला उत्कंठा आहे; कारण देहांत रहाण्यापेक्षां हें फारच चांगले आहें; तरी मी देहांत राहाणें तुम्हांकरितां अधिक गरजेचें आहे." फिलीप्पैकरांस पत्र १:२१-२४

"यरूशलेमेंत सर्व यहुदीयांत शोमरोनांत व पृथ्वीच्या शेवटांपर्यंत तुम्हीं माझे साक्षी व्हाल." प्रेषितांची कृत्यें १:८

" म्हणून तुम्हीं प्रभूच्या कामांत सर्वदा अधिकाधिक तत्पर असा." करिंथकरांस पहिले पत्र १५:५८

"आपण आपल्या विश्वासाचा उत्पादक व पूर्ण करणारा येशू ह्याच्याकडे पाहात असावें." इब्री लोकांस पत्र १२.२

"तुम्हांस पतनापासून राखण्यास आणि आपल्या ऐश्वर्ययुक्त सान्निध्यांत निर्दोष असें उल्लासानें उभें करण्यांस - जो समर्थ आहे, अशा आपल्या उद्धारक एकाच देवाला, येशू ख्रिस्त आपला प्रभु ह्याच्या द्वारें गौरव, महिमा, पराक्रम व अधिकार हीं युगारंभापूर्वी, आतां व युगानुयुग आहेत." आमेन. यहुदाचे पत्र १: २४-२५

